1 एस.सी.सी. ३९६/२०२२
सरकार वि. सागर देशमुख.
**निशाणी १५ सोबत**

**<u>अभियोगपक्षातर्फे सा.क्र. १ याची जबानी</u>**
**<u>मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की,</u>**

| | |
|---|---|
| माझे नाव – स्वाती प्रदिप देशमुख, | वय – ६२ वर्षे, |
| व्यवसाय – घरकाम, | राहणार – अकोले, |
| तालुका – अकोले, | जिल्हा – अहमदनगर. |

**<u>सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत</u> –**

१. घटना दिनांक २२.०६.२०२२ रोजी संध्यकाळी ०७:०० वाजता नवलेवाडी फाटा येथे घडली होती. त्यावेळी माझे पती प्रदिप दत्तात्रय देशमुख हे राजुर रोडला फिरण्यासाठी गेले होते त्यावेळी त्यांना एका अज्ञात वाहनाने धडक दिली. सदर वाहनाचा नोंदणी क्रमांक व चालकाचे नाव काय होते हे मला माहीती नाही. सदर अपघातामध्ये माझ्या पतीच्या डोक्याला, हातापायाला लागले होते. माझ्या पतीस अगोदर अकोले येथील ग्रामीण रूग्णालयामध्ये नेले होते व तेथून त्यांना संगमनेर येथील आरोटे हॉस्पीटल येथे नेले होते. तेथून आल्यानंतर मी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. आता मला अभिलेखावरील माझी फिर्याद व छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला त्यावर माझी सही असून त्यातील मजकुराबाबत मला माहिती नाही. फिर्याद मी वाचून पाहिली नव्हती. सहीस अनुक्रमे **निशाणी १७ व १८** देण्यात येते.

*(साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास भारतीय साक्षीपुरावा कायदा कलम १५४*

*प्रमाणे उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)*

**<u>उलटतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत</u> –**

२. हे म्हणणे खरे आहे की, माझे पतीच्या अपघाताबाबत रामनाथ मंडलीक यांनी मला घरी येवून सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, माझ्या पतीस एम.एच ०४ एच.एक्स ९६०८ या गाडीने पाठीमागून नवलेवाडी फाटा येथे धडक दिली. हे म्हणणे खरे नाही की, त्यांनी त्या गाडीवरील चालक सागर विजय देशमुख असल्याचे सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, मी व रामनाथ मंडलीक असे ग्रामीण रुग्णालय अकोले येथे गेलो.

३. आता मला माझ्या फिर्यादीमधील अधोरेखांकित भाग 'अ' मधील मजकुर वाचुन दाखवण्यात आला. तो मी पोलिसांना सांगितला नव्हता. पोलिसांनी तो माझ्या फिर्यादीमध्ये का नमुद केला याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा मजकूर मी पोलीसांना सांगितला होता व तो पोलीसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे नमूद केला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्यामध्ये व आरोपीमध्ये न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्यामध्ये तडजोड झाली असल्यामुळे आरोपीला शिक्षा होऊ नये म्हणुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

एस.सी.सी. ३९६/२०२२
सरकार वि. सागर देशमुख.
**निशाणी १५ सोबत**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एस. एस. साबळे यांच्या मार्फत</u>**

उलटतपास नाकारला.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2026.02.02 17:54:47 +0530

दिनांक ०२.०२.२०२६
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
कोर्ट नं. २, अकोले.